प्रकरण चौथे

# 'पर्व' मधील व्यक्तिरेखा

- ❖ प्रस्तावना
- ❖ 'पर्व' मधील प्रमुख व्यक्तिरेखा
- ❋ भीष्म
- ❋ भीम
- ❋ अर्जुन
- ❋ कर्ण
- ❋ कृष्ण
- ❋ कुंती
- ❋ द्रौपदी
- ❖ गौण व्यक्तिरेखा
- ❋ धर्म
- ❋ शल्य
- ❋ दुर्योधन
- ❋ सालकटंकटी
- ❋ उलुपी, चित्रांगदा आणि सुभद्रा
- ❋ गांधारी
- ❋ हिरण्यवती आणि उत्तरा
- ❖ समारोप
- ❖ संदर्भ सूची

## प्रस्तावना

महाभारत ही कथा असंख्य व्यक्तिरेखा घेऊन आली आहे. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट व्यक्तिरेखेला महाभारत कथेचा नायक ठरविणे कठीण आहे. व्यासांनी ज्या व्यक्तिरेखा महाभारतात साकार केल्या आहेत त्या सर्वसामान्य माणसासारख्याच आहेत. आणि त्याच पार्श्वभूमीवर 'पर्व' या कादंबरीत आलेली कोणतीही एकच व्यक्तिरेखा नायक ठरत नाही. संपूर्ण कादंबरीमध्ये कथा भागानुसार व्यक्तिरेखा प्रकटताना दिसून येतात.

'पर्व' मध्ये भीष्म, भीम, अर्जुन, कुंती, द्रौपदी, शल्य, धर्म, यासारख्या अनेक व्यक्तिरेखा आपल्यासमोर महत्त्वाच्या व्यक्तिरेखा म्हणून येतात. काही प्रमुख व्यक्तिरेखा येतात तशा गौणही व्यक्तिरेखाही येतात. तर काही व्यक्ती या घटनांचा साक्षीदार असल्यासारख्या वाटतात. पण अशा व्यक्तिरेखांना नायक म्हणता येणार नाही. कृष्ण, भीष्म या व्यक्तिरेखा सर्व कादंबरीमध्ये महत्त्वाच्या ठरलेल्या आहेत. या व्यक्तिरेखांवर चढलेली दैवतीकरणाची पुटे बाजूला सारून भैरप्पांनी त्यांना माणूस म्हणूनच 'पर्व' मध्ये साकार केल्या आहेत. रूढ मिथकांचा नवा अन्वयार्थ त्यांनी लावला आहे. त्या त्या व्यक्तिरेखांचे पूर्ण मानवीकरण केले आहे.

प्रस्तुत कादंबरीत येणारी प्रत्येक व्यक्तिरेखा ही भूतकाळ आठवून वर्तमानकाळात वावरताना भविष्याचा वेध घेत आहे असे जाणवते. आणि हा वेध घेताना या व्यक्तिरेखा अंतर्मनाचा ठाव घेणाऱ्या ठरल्या आहेत.

## 'पर्व' मधील प्रमुख व्यक्तिरेखा

'पर्व' कादंबरीमध्ये साकारलेल्या व्यक्तिरेखा या युद्धाची पार्श्वभूमी घेऊनच आलेल्या आहेत. महाभारतीय आणि त्या त्या व्यक्तिरेखांच्या गतजीवनाची सांगड घातल्याचा विलक्षण प्रत्यय कादंबरी वाचताना येतो. प्रत्येक व्यक्तिरेखा जणू आपले अंतर्मन व्यक्त करत आहे असे जाणवते. 'पर्व' मधील काही व्यक्तिरेखांचा आढावा पुढीलप्रमाणे घेत येईल.

**भीष्म**

महाभारतात भीष्म ही व्यक्तिरेखा महत्त्वाची असून 'पर्व' मध्येही ती तशीच साकार झाली आहे. जणू काही सर्व कथेचा सूत्रधार असलेली ही व्यक्तिरेखा सुरुवातीपासूनच ते शेवटपर्यंत आपले वेगळे असे अस्तित्व शोधणारी एक महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा म्हणून ओळखली जाते.

एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणून साकार होणारी भीष्म ही व्यक्तिरेखा 'पर्व' मध्ये आपल्याला प्रथम परिचित होते ती शल्य राजाच्या चिंतनामधून आणि संपूर्ण कादंबरीमध्ये प्रत्येक भागामध्ये ती आपल्या समोर स्पष्ट होत जाते. त्यानंतर आपल्या समोर कादंबरीच्या उत्तरार्धात म्हणजेच नवव्या आणि बाराव्या भागामध्ये येते. या सर्व भागांमधून आढळणारी भीष्माची व्यक्तिरेखा ही प्रत्येक व्यक्तिरेखेच्या मनामध्ये असलेले तिचे स्थान दृढ करताना दिसून येते. युद्धाच्या प्रसंगी आपली भूमिका काय किंवा कशी असावी, हे ठरवताना भूतकाळामध्ये भीष्माच्या जीवनामध्ये घडलेल्या गोष्टींचा वेध कादंबरीमध्ये घेतला आहे.

धर्म आणि अधर्माच्या चक्रामध्ये आडकलेला भीष्म आपल्या आत्मचिंतनातून जीवनाचे सत्य उलगडताना, धर्म - अधर्म, योग्य - अयोग्य, सत्य - असत्य, ब्रह्मचर्य, ग्रहस्थाश्रम या सर्वांमधून आयुष्याच्या उत्तरार्धात जीवनाचा वेध घेत आपल्या समोर येतो. भीष्माच्या जन्मापासूनचे अनेक प्रसंग समोर येतात. भीष्म आईविषयी असलेला राग, तिरस्काराची भावना व्यक्त करतो. शंतनूला पडलेल्या मोहामुळे भीष्माला आजन्म ब्रह्मचारी राहावे लागते.

पित्यासाठी भीष्म सिंहासनाचा त्याग करतो. आणि आजन्म ब्रह्मचारी राहण्याची शपथ घेतो. त्यातून एक त्यागी व्यक्तिमत्व आपल्यासमोर साकार होत जाते. भीष्माचे खरे नाव देवव्रत. गंगेपासून जन्मलेला मुलगा म्हणून 'गंगातनय'. आजन्म ब्रह्मचारी राहण्याच्या प्रतिज्ञेमुळे भीष्म हे नाव नंतर रूढ झाले. ब्रह्मचारी राहण्याची प्रतिज्ञा जरी भीष्माने केली असली तरी ग्रहस्थाश्रमाच्या कोणत्याही जबाबदऱ्यापासून त्याची सुटका झालेली नाही. उलट ग्रहस्थाश्रमाच्या भोवऱ्यामध्ये तो आयुष्यभर गुरफटत गेलेला

दिसून येतो. सत्यवती आणि शंतनू यांचा मुलगा चित्रागंद मरण पावल्यावर विचित्रर्याचा राज्यभिषेक केला जातो. पण राज्यकारभार मात्र भीष्माला करावा लागतो.

भीष्म कुरूवंशाच्या वृद्धीसाठी विचित्रर्याला अंबिका आणि अंबालिका या दोन मुलींचे हरण करतो. पण विचित्रर्याच्या अकाली मृत्यूमुळे कुरूवंशाची जबाबदारी भीष्माकडेच राहते. वंश वाढविण्यासाठी सत्यवती नियोग पद्धतीचा अवलंब करण्याचे ठरवते. आणि भीष्माला नियोगासाठी विणवते. 'भीष्म म्हणजे ब्रह्मचर्य आणि ब्रह्मचर्य म्हणजे भीष्म' असे समीकरण निर्माण झालेले असल्याने याला भीष्म नकार देतो. म्हणून नियोगासाठी सत्यवतीचा कानीन पुत्र कृष्णद्वैपायन याला बोलावले जाते. कृष्णद्वैपायन यांच्याकरवी अंबिकाला 'धृतराष्ट्र', अंबालिकाला 'पांडू' आणि या दोघीची दासी हिला 'विदूर' अशी नियोगाने मुले होतात. आपली प्रतिज्ञा न मोडता कुरूवंशाच्या हितासाठी योग्य ठरेल असा निर्णय भीष्म घेतो. यातूनच त्याची प्रतिमा आणखी उजळून येते.

राज्यासाठी पांडूपुत्र आणि धृतराष्ट्र पुत्र यांच्यात युद्ध निश्चित होते. पांडूला नियोगाने झालेली मुले धर्माची की अधर्माची, नियोग योग्य की अयोग्य या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा भीष्माचा प्रयत्न आहे. यातून मार्ग काढण्यासाठी भीष्म कृष्णद्वैपायन व्यास याच्या आश्रमात जातो. त्यावेळी स्वत: विचित्रविर्याच्या बायकांना नियोगाने संतती दे म्हणणाऱ्या भीष्माच्या पुढे पुतण्याच्या मुलांच्या जन्माचा प्रश्न उभा रहावा याचे व्यासाला आश्चर्य वाटते. त्यावेळी कृष्णद्वैपायन यांचे वक्तव्य महत्त्वपूर्ण ठरते, ''संतती साठी नियोग हा धर्मच आहे, तूच अशा निर्णयाप्रत येऊन, माझ्या आईला सांगून मला बोलावून घेतलं होतस. ज्यावर ऐंशी वर्षापूर्वी तुझा पूर्णपणे विश्वास होता. त्याविषयी आता मला विचारून निरसन करून घ्यावं, असं वाटण्या एवढी तरी शंका तुझ्या मनात का निर्माण झाली?''[९] असा प्रश्न द्वैपायनांला पडलेला आहे. धृतराष्ट्र आणि पांडू यांच्या जन्माविषयी आपल्या मनात शंका नव्हती आणि पांडव जन्मले तेव्हाही नव्हती. मग आता का यावी या प्रश्नाचे उत्तरही भीष्माला सापडत नाही.

युद्धाच्या प्रसंगी भीष्म, कौरव सैन्याचे सेनापतीपद स्वीकारतो. ज्यांनी लहानाचे

मोठे केले. ज्यांनी वाढवले त्यांच्या विरूद्ध शस्त्र कसे धरायचे हा पांडवांचा प्रश्न आहे. युद्धासाठी ठरवलेले नियम भीष्माने सक्तीने सैन्याला स्वीकारण्यास भाग पाडले आहे. भीष्मा बरोबर लढण्यासाठी कृष्णाच्या राजनितितून शिखंडीला पुढे केले जाते. युद्धाच्या नियमानुसार भीष्म शिखंडीवर शस्त्र उचलत नाही. अशा योध्यावर शस्त्र धरणार नाही हा भीष्माचा नियम आहे. तेव्हा शिखंडीने भीष्माविषयी काढलेले उद्‌गार, ''अरे ए मस्तवाल भीष्मा ! मला, अबला स्त्री ....... माझं आव्हान स्वीकारण्याचं धैर्य नसेल तर, जमीनीला हात लावून नमस्कार कर?'' [२] भीष्म हे अव्हान स्वीकारत नाही. आणि सेनापती पदाचा त्याग करून देहत्याग करण्याचे भीष्म निश्चित करतो. असंख्य बाणांची शैया करून मरणाची वाट पाहत बसून राहतो. दुर्योधन त्यांना यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. शेवटी मात्र युद्धाची समेटी व्हावी ही आशा दुर्योधनाजवळ व्यक्त करतो.

म्हणजेच दुर्योधनाच्या बाजूने युद्धात उतरलेल्या भीष्माच्या मनात पांडवांविषयी नितांत प्रेम आहे. सेनापती पद स्वीकारण्यामागची एक भूमिका असावी असे वाटते. ती म्हणजे सेनापती पद स्वीकारून युद्धामध्ये अनेक मर्यादा ठेवून समेट घडविण्याचा प्रयत्न.

एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणून भीष्म ही व्यक्तिरेखा 'पर्व' मध्ये साकारलेली आहे. त्यांचा पराक्रम, निर्धार, त्याग, ज्ञान, असामान्य धैर्य, निष्ठा हे सारे लोभणीय वाटते. धर्माची जाण असलेला भीष्म सामान्यपणे आपल्यासमोर येतो. अशा या व्यक्तिरेखेच्या भोवती असलेले मिथकांचे वलय भैरप्पा बाजूला करतात. पण भैरप्पांनी भीष्माच्या मृत्यूवर प्रकाश टाकलेला दिसत नाही. भीष्माचे मन मानवी पातळीवर जाणून घेण्याचा एक लक्षणीय प्रयत्न 'पर्व' मध्ये दिसतो.

### भीम

'पर्व' कादंबरीमध्ये आलेली भीमाची प्रतिमा मिथकांचे उच्चाटन करते. जनमनामध्ये रूढ असणाऱ्या भीमाची व्यक्तिरेखा ही बलाढ्य, राक्षसी प्रवृत्तीची, वायूपासून जन्माला आलेले मुल अशा स्वरूपाची असलेली दिसून येते. 'पर्व' मध्ये मात्र जितका भीम बलाढ्य होता तितकाच तो भावविवशही होता असे स्पष्ट केले आहे.

भीम हा कुंतीचा नियोगाद्वारे झालेला मुलगा. देवलोकातील सैन्याचा सेनापती 'मरूत' याच्या पासून झालेला आहे. भीमाचे वर्णन कुंती करते, ''एका वर्षाच्या भीमाला उचलून कडेवर घेणं आणि त्या चढ - उताराच्या प्रदेशात फिरणं म्हणजे काही सामान्य काम नव्हतं, अजून तो पावलंही टाकत नव्हता.'' [३] अशी बालपनापासून ध्येययष्टी असलेला भीम दिसून येतो.

त्रेपन्न - चोपन्न वर्षाचा भीम आपल्या जीवनातील तळमळीचे क्षण वाचकांपूढे व्यक्त करतो. द्युतामध्ये सर्व काही हरल्यानंतर वनवास आणि अज्ञातवास पूर्ण करून पांडव आपल्या राज्याची मागणी करतात. परंतु दुर्योधनाने राज्य देण्याचा नकार दिल्याने युद्धाच्याद्वारे राज्य मिळविण्याचा एक मार्ग पांडव स्वीकारतात. पण राजसत्तेसाठी होणारे युद्ध हे राजसत्तेसाठी न होता ते धर्म आणि अधर्माच्या पातळीवर उतरत जाते. घटत्कोच हा भीमाचा मुलगा, याच्याकडे युद्धासाठी सहाय्य मागण्यासाठी भीम हिडिंब वनात चालला आहे. त्यावेळी आपल्या गतजीवनातील अनेक घटना भीम वाचकांपूढे व्यक्त करतो. तापट, साहसप्रिय, संतापी, आत्मियतेचा गंधच नसलेला भीम 'पर्व' मध्ये रेखाटला आहे. असा भीम अनेक ठिकाणी मात्र भावूक होताना दिसून येतो.

वनवासातून परत आल्यानंतर भीमाला सारे जीवनच निरर्थक वाटते. भीम म्हणतो, ''आता मला यापेक्षा तेच आयुष्य बरं वाटतं. माझ्या मनात आता असलेली एकमेव इच्छा म्हणजे दुर्योधन, दु:शासन, कर्ण, शकुनि आणि इतर समस्त कौरवांना ! त्या कौरवांना जन्म देणाऱ्या आंधळ्याला ठार करायचा ! द्युत सभेत माझ्या बायकोला असभ्य बोलून तिचा अपमान करणाऱ्या आणि अपशब्द बोलून आम्हाला डिवचणाऱ्या प्रत्येकाचा वेचून जीव घ्यायचाय !'' [४] म्हणजेच युद्धामध्ये द्युतसभेत झालेला अपमान आणि द्रौपदीची झालेली विटंबना या सूडा पोटी भीम युद्धात सहभागी होतो.

भीमाजवळ असणारे मुष्ठीयुद्धातील कौशल्य हे त्याने हिडिंब, बक, किर्मिर हे राक्षस आणि जरासंध, किचक यांना ठार केले यावरून पटते. असा हा भीम सालकटंकटीला सोडून जाताना मात्र भावविवश झाला होता. सालकटंकटी विषयी वाटणारी विलक्षण ओढ, असहाय्यतेची भावना, तिला सोडून आलो म्हणून आलेला

राग, खेद हे सर्व एकाच वेळी भीमाच्या मनामध्ये दाटून येते.

भीमाच्या क्रुरपणाची साक्ष पटते ती युद्धाच्या प्रसंगी. युद्धभूमीवरील संजयाने केलेल्या वर्णनातून भीमाच्या तापट स्वभावाची जाणीव होते. युद्धाच्या वेळी भीमाने कौरवसेनेचा मोठ्या प्रमाणात संहार केला आहे. भीम अपमानाच्या ओझ्याखाली दबलेला आहे. त्याने युद्धभूमीवर दुर्योधनादी भावंडांना शोधून त्यांची मुंडकी पिरगळली आहेत. घटत्कोचाला कर्णाने ठार केल्यानंतर भीम सर्वस्व हरवून बसल्यासारखा वाटतो. कर्णाला मारण्यासाठी निघालेला भीम अर्जुनाला म्हणतो, ''अर्जुना कर्ण तुझी शिकार आहे, असं आजवर म्हणत होतास, तू शिकार करणार आहेस, की मी त्याचा घास घेऊ?'' ५ अशाप्रकारे भीम पुत्रशोकाने संतप्त झालेला दिसतो.

प्रतिज्ञा पूर्ण करताना भीमामध्ये असलेला राक्षसीपणा दिसून येतो. दु:शासनाला मारण्याच्या प्रसंगातून भीमाच्या क्रुरपणाची जाण होते. 'दु:शासनाला जमीनीवर उत्ताण पाडून भीम गरजला, तुझी छाती फोडून रक्त पिईन असे गर्जून दु:शासनाची छाती फोडली आणि बाहेर आलेले ते रक्त पिणाऱ्या भीमाचं वर्णन भैरप्पा करतात, ''छातीतून उसळून वाहणारं ताज रक्त दोन्ही हातात गोळा करून भीमानं दोन तीन वेळा तोंडाला लावलं, उष्ण रक्ताच्या खारट चवीमुळे त्याच्या चेहऱ्यावर किळस उमटली, हनुवटी, गाल, ओठांना रक्त लागल्यामुळे तो भयंकर दिसत होता. अरे ऐ दुर्योधना ! ये सोडव, ये ! कर्णा ' तु ये याला सोडवायला ! शकुनि, कृतवर्मा, अश्वत्थामा ! या सोडवा या याला ........... '' ६

भैरप्पांनी पर्व मध्ये रेखाटलेला भीम शेवटी युद्धामधून विजय प्राप्त करूनही असहाय्य झाला आहे. शेवटी भीम सालकटंकटीला भेटण्यास हिडिंब वनात जातो. पण आर्यजनांनी अरण्य पेटवून दिलेली आहेत. ज्या ठिकाणी सालकटंकटीची झोपडी ती जागा निर्मनुष्य झाली आहे. पावसाचे थैमान आणि सालकटंकटीला भेटण्यासाठी भीमाने घातलेला थैमान भैरप्पांनी शेवटच्या भागामध्ये टिपले आहे.

'पर्व' कादंबरीमध्ये रेखाटलेला भीम हा सर्वसामान्य माणूसच होता. हाताश भीमाची व्यक्तिरेखा रेखाटताना तिला रूढ मिथकांतून बाहेर काढून वास्तव जीवनातील

सत्य मांडण्याचा प्रयत्न भैरप्पांनी केला आहे.

## अर्जुन

महाभारतातील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणून अर्जुनाकडे पाहिले जाते, देवत्वाचा अंश प्राप्त झालेली ही व्यक्तिरेखा आपल्या व्यक्तिमत्वाने सर्वांनाच आकर्षित करून घेते. 'पर्व' मध्ये मात्र ही व्यक्तिरेखा सामान्य माणूस म्हणूनच येते. धर्म आणि न्याय यांच्यामध्ये प्रविण असलेला अर्जुन भैरप्पांनी मत्सरासह रेखाटला आहे. सर्वसामान्य माणसाच्या ठिकाणी असलेले राग, द्वेष, आपुलकी हे सर्व त्याच्या ठिकाणी दिसते. अर्जुनावर परंपरेने घातलेले मिथकांचे कवचमात्र या कादंबरी मध्ये गळून पडलेले आहे.

अर्जुनाचा जन्म हा देवलोकातील इंद्रापासून झालेला आहे हे कुंती स्पष्ट करते. नियोगपद्धतीने झालेला अर्जुन हा कुंतीचा तिसरा मुलगा आहे. मंत्रापासून झालेला मुलगा हे मिथकाचे अवरण स्वत: कुंती बाजूला सारते. ''धारदार नाक, रेखीव भुवया, हिमासारखा शुभ्र रंग, माझ्या उंची एवढी उंची'' [८] असे कुंती इंद्राचे वर्णन करते. आणि हे सारे विशेष अर्जुनामध्ये आहेत हे कुंती स्पष्ट करते. लहानपणापासून कुशल बुद्धीचा अर्जुन जसे महाभारतामध्ये वेगळेपण सिद्ध करतो. तसेच ते 'पर्व' मध्येही सिद्ध करताना दिसतो.

अर्जुन द्रौपदीच्या विवाहचा पण जिंकतो. मात्र द्रौपदी त्याच्या एकट्याची न होता ती पाचजणांची होते. पाहताक्षणी अर्जुनावर मोहून गेलेली द्रौपदी अर्जुनाचं वर्णन करते, ''बोलण्यातलं खरं कौशल्य पहावं, ते अर्जुनाच ! धनुर्विद्येएवढाच यातही निपूण! त्याच्या प्रत्येक शब्दाशब्दाला मन एकेक पायरी उतरून स्वत:च्याही नकळत त्याच्यात मिसळून जाईल, अशी विलक्षण जादू पसरवणारं त्याचं मोहक बोलणं ! संपूर्ण आर्यवर्तातला चतुर धनुर्धारी म्हणून स्वयंवर मंडपात मला जिंकून घेणारा मनस्वी नेमबाज ! एवढं जड धनुष्य वाकवून नेम धरतानाही लक्षावरची नजर ढळणार नाही, अशी, एकाग्रता ! शिवाय त्याच रूप ! सरळ धारदार नाक, रेखीव भुवयां. गालाची मोहक ठेवण, शुभ्र गोरापानं रंग, आणि ते निळे - निळे डोळे !''[९] या वर्णनातून अर्जुनाची

व्यक्तिरेखा आपल्या समोर उभी राहते.

चतुर, रसिक, वीर, सुंदर, अहंकारी सुखकांक्षी असा अर्जुन द्रौणाचार्यांचा उत्तम शिष्य बनतो. धनुर्विद्येतील सर्व कला या अर्जुनाने वश केलेल्या आहेत. तो म्हणतो, ''ज्याचा वेध घ्यायचा, ती वस्तू नजरेला पडणं, त्यासाठी कमानीला प्रत्यंचा जोडणं, बाण लावणं, दिशेची जाण घेऊन बाण सोडवा आणि लक्ष्यावर बाण बसणं ! एवढ्या सगळ्या घटना वेगवेगळ्या राहण्यापेक्षा या सगळ्यांची मिळून एक घटना व्हायला हवी. दृष्टी, मनगट, दंड, अद्वितीय प्रावीण्य मिळवणं केवळ अशक्य आहे.''[१०]

युद्धामध्ये अर्जुनाच्या रथाचे सारथ्य कृष्णाने केले आहे. युद्धातून होणारा संहार यामुळे अर्जुनाला युद्ध नको वाटते. तो म्हणतो, ''राज्याच्या मोहापायी त्यांना ठार करणं हा धर्म आहे का? या मोठ्या युद्धात कोणीही जिंको, पण आर्य व तीतले पुरूष मोठ्या संख्येने मारले जाणार त्यामुळे नंतर आमच्या पवित्र आर्य स्त्रियांना हलक्या जातीतले, त्यातही आर्यतर लोक पळवून घेऊन जातील. पुरुष नसल्यामुळं कामतृष्णेत तळमळणाऱ्या आपल्या स्त्रियाच त्यांच्या मागं लागतील. त्यावेळी वर्ण-संकर होऊन अधर्म घडेल.''[११]

कृष्ण धर्म काय आहे हे अर्जुनाला सांगून, तुम्ही जन्माला आला ते स्वैराचारातून, हे मान्य करून युद्धातून माघार घ्यायला लावतो. अर्जुनाचा स्वाभिमान जागृत करण्याचे काम कृष्णाने केले आहे. युद्धाला तयार झालेला अर्जुन मात्र वेळोवेळी भावनिक होताना दिसतो. धृष्टाद्युम्नाने द्रौणाचार्यांचा वध केल्यानंतर गुरूबद्दला असणारा त्याच्या मधला आदर दिसतो. अभिमन्यूच्या वधानंतर शोककूल होणारा अर्जुन वाचकांच्या मनावर विशेष परिणाम करतो. जयद्रथ वधाचा प्रसंग आणि कर्ण वधाचा प्रसंग यावरून त्याच्या चातुर्यची कल्पना येते.

'पर्व' मध्ये रेखाटलेल्या अर्जुनावरील दैवीपणाची पुटे बाजूला करून सामान्य माणसासारखाच तो आला आहे. त्याच्या ठिकाणी असणाऱ्या भावभावना, द्वेश, प्रेम, राग, मत्सर, सूड, जिव्हाळा, आपुलकी या साऱ्या गोष्टी जनमानसात ज्या प्रकारे पहावयास मिळतात तशाच अर्जुनामध्येही पहावयास मिळतात.

**कर्ण**

कर्ण ही व्यक्तिरेखा वाचकांच्या मनावर विशेष परिणाम करणारी आहे. कर्ण हा कुंतीचा कानीन पुत्र हे वास्तव भैरप्पा उलगडून दाखवतात. क्षत्रिय म्हणून जन्मलेला कर्ण आयुष्यभर सूत म्हणून जीवन जगतो. भैरप्पांनी कर्ण जन्माचे मिथक उलगडण्याचा लक्षणीय प्रयत्न केलेला आहे. कर्ण हा दुर्वास ऋषीपासून झालेला मुलगा हे सत्य भैरप्पा मांडतात.

सुरूवातीपासूनच कुंतीला मुलांविषयी ओढ होती. यातून दुर्वासऋषीला मुल जन्माला कसे येते हा प्रश्न विचारते. या प्रश्नाची अतुरता जाणून घेऊन दुर्वासऋषीपासून झालेला कर्ण. सूर्यापासून झालेला मुलगा हे मिथक कुंती स्वत:च उलगडते. कर्णाच्या जन्माविषयी कुंती सांगते, ''जन्मल्यावर रडलं ते बाळ ! नाक, तोंड, हात, पाय असलेलं जिंवत बाळ ! माझं कुतूहल एकदाचं शांतावलं, पण माझ्या हातातलं ते नवं आश्चर्य उचलून नेण्यात आलं !'' [१२] इथूनच कर्णाच्या दुर्दैवी आयुष्याला सुरूवात झाली आहे.

कर्णाच्या मनामध्ये दुर्योधनाबद्दल नितांत आदर आहे. आयुष्भर त्याच्या सर्व कुटील कामामध्ये त्याला मदत करत राहतो. जन्माचे रहस्य समजूनही मैत्रीसाठी पांडवांच्या विरूद्ध युद्धात भाग घेतो. सर्वप्रथम कृष्ण कर्णाच्या जीवनाचे सत्य कर्णाला सांगतो. तेव्हा कृष्ण म्हणतो की, ''तुझा चेहरा पाहताच आत्याचा चेहरा पाहिल्यासारखं वाटलं ! किती पराकोटीचे साम्य मोठे डोळे, कपाळाची ठेवणं अगदी तसं आहे.'' [१३] हे सत्य सांगितल्या नंतर कर्णाच्या मनाची झालेली संभ्रमास्था भैरप्पांनी रेखाटली आहे.

पांडवांच्या बाजूला गेलो तर आपणच कुरूवंशाचा अधिपती होऊ अशी भावना कर्णाच्या मनामध्ये निर्माण होते. पण दुर्योधनाचा पक्षपात करण्याची कल्पना त्याला योग्य वाटत नाही. आपण फक्त राधेचा मुलगा आहोत. आपल्याला युद्धातून बाजूला करण्याचे कपट आहे. हीच जाणीव त्याच्या मनात निर्माण होते.

कुंती वयाच्या ऐक्याशींव्या वर्षी कर्णाची भेट घेते. तेव्हा कर्ण म्हणतो, ''वयामुळं थोडी वाकलेली असली तरी लांब बाहू, रूंद खांदे, विशाला डोळे आणि कपाळ, शुभ्र

केस सारं काही आपलच मुळ रूप आसल्याचा अभास.'' [१४] कृष्णाने सांगितलेले सत्य कर्णाला एकाएकी खरे वाटू लागते. कुंती कर्णाला सांगते, ''कितीही वर्ष झाली असली, तरी तू माझाच मुलगा ! पांडव तुझेच भाऊ ........''[१५] सर्व काही समजले असताना देखील कर्ण दुर्योधनाला सहाय्य करण्यासाठी त्याच्या बाजूने युद्धात सहभागी होतो.

दानशूर, पराक्रमी, वीर योद्धा म्हणून पुढे आलेल्या कर्णाला आयुष्यभर अपमान, तिरस्कार, सूतपूत्र म्हणून वागणूक मिळाली आहे. भैरप्पांनी रेखाटलेला कर्ण हा कवचकुंडल, सूर्याच्या तेजाने तळपणारा, तेजस्वी या सर्वातून बाहेत पडून तो मानवी पातळीवर आलेला आहे हे स्पष्ट होते. आजवर मराठी साहित्यात परंपरेने कर्णावर अनेक अवरणे घातली आहेत. मात्र या गोष्टीचा लवलेशही 'पर्व' कादंबरीमध्ये पहायला मिळत नाही. अशी वाचकांच्या मनाला भूरळ घालणारी व्यक्तिरेखा भैरप्पांनी टिपली आहे.

**कृष्ण**

मुळातच दैवी रूप घेऊन जन्माला आलेली व्यक्तिरेखा म्हणून महाभारतात ओळखली जाते. मात्र 'पर्व' कादंबरीमध्ये आलेला कृष्ण हा एक सर्वसामान्य पण चतुर व्यक्ती म्हणूनच आलेला आहे. कृष्ण ही व्यक्तिरेखा इतर व्यक्तिरेखांच्या चिंतनातून साकार झालेली आहे. अनेक व्यक्तिरेखांच्या जीवनाचा साक्षीदार असल्याप्रमाणे कृष्ण 'पर्व' मध्ये वावरत आहे असे वाटते.

पांडवांना सर्वातोपरी मदत करणारा कृष्ण हा कुंतीचा भाचा आणि अर्जुनाचा सखा म्हणून ओळखला जातो. जन्मताच अज्ञातवास वाट्याला आलेल्या कृष्णाला कसलाच मोह नाही. त्याच्याजवळ असणारा नम्रपणा आणि लाघवी बोलणं यामुळे सर्वाच्या मनावर एक वेगळाच ठसा उमटतो आहे. पांडवांच्या राज्यसूय यज्ञा मागचा खरा सूत्रधार कृष्णच आहे. कृष्णाविषयी भीम आपले मत व्यक्त करतो, ''मूर्तीमंत उत्साहाचं नावं कृष्ण ! त्याच्या तल्लख बुद्धीला आणि सळसळणाऱ्या उत्साहाला अंतच नाही.'' [१६] अशा या कृष्णाची अनेक वैशिष्टये आपल्या समोर येतात.

दैवीपणाचा अंश असलेला कृष्ण देवाचा अवतार म्हणून जनसामान्यांमध्ये

ओळखला जातो. अर्जुनाला वेळोवेळी साथ देणारा कृष्ण धर्म आणि अधर्माचा जाणकार व्यक्ती म्हणून याठिकाणी येतो. अर्जुन म्हणतो, "संकोचाला पळवून लावून, मन निर्धास्त करून, पुरुषार्थाला उभारी देणारा त्याचा सहवास !"[१७] असा हा अर्जुनाचा सखा असणारा कृष्ण शेवटपर्यंत पांडवांना मदत करतो.

नरकासूराने पळवून नेलेल्या स्त्रियांशी कृष्ण विवाह करतो आणि त्यांच्या मुलांचे पितृत्व स्वीकारतो अशी प्रौढ व्यक्ती म्हणूनही कृष्ण आपल्या समोर येत राहतो. त्याचबरोबर त्याच्याजवळ असणारी कपटनीतीही दिसून येते, ती जरासंधाच्या वधातून.

कृष्ण ही व्यक्तिरेखा महाभारतामध्ये अतिमानवी असली तरी, 'पर्व' मध्ये मात्र मानवी जीवनात असणाऱ्या आशा, आकांक्षा, ध्येय, यामधूनच ती वावरते. भैरप्पांनी या व्यक्तिरेखच्या भोवती मानवी वलय निर्माण केले आहे. त्यामुळे ती आपल्यातीलच एक वाटते. चमत्कारांचे गूढ म्हणून कृष्णाला ओळखले जाते. द्युतसभेतील वस्त्रहरणाचा प्रसंग या प्रसंगावेळी कृष्णाने द्रौपदीचे रक्षण केले असे रूढ झाले आहे. म्हणून कृष्णाला पूजनीय मानले जाते. पण भैरप्पा मात्र ही सर्व मिथंक बाजूला सारतात आणि त्यातील वास्तव मांडतात.

कृष्णाविषयी भैरप्पा म्हणतात, "महाभारतातील ही व्यक्तिरेखा इतकी बहुरंगी आहे की, तिचं पूर्णपणे अकलन होणं कठीण !"[१८] म्हणून 'पर्व' मधील कृष्ण मिथकांपासून वेगळा होऊन मानवीपण लाभलेली व्यक्ती म्हणून स्पष्ट होत जाते.

**स्त्री व्यक्तिरेखा**

**कुंती**

'पर्व' कादंबरीमध्ये ही व्यक्तिरेखा अत्यंत प्रभावी ठरलेली आहे., कुंतीचा या ठिकाणी घेतलेला वेध वाचकांच्या मनावर विशेष परिणाम करतो आहे. कुंती आपल्या समोर स्पष्टपणे येते ती दुसऱ्या भागात नंतर ती द्रौपदी, भीम, अर्जुन, कर्ण यांच्या चिंतनातून स्पष्ट होते.

वृद्धापकाळ जवळ आलेली कुंती गंगा नदीच्याकाठी बसून आपल्या तारुण्यातले

दिवस आठवते आहे. अशी कुंती स्पष्ट होत जाते. उंच ध्येययष्ठी, सुरकुतलेला चेहरा, उंच आणि रूंद बांधा या सर्वामुळे शोभून दिसणारे पृथा हे नाव साजेसे असेच आहे. कुंतीची व्यक्तिरेखा ही आयुष्यभर दु:ख सहन करणारी सहनशील व्यक्तिरेखा म्हणून येते. पौरुष्यगमावून बसलेल्या पांडूशी विवाह करून दु:खी झालेली कुंती आपल्या सार्‍या व्यथा जणू गंगा नदीलाच सांगते आहे असे वाटते.

वृद्धापकाळामध्ये कुंतीला स्पष्टपणे आठवणारा प्रसंग म्हणजे स्वयंवराचा. कुंतीच्या स्वयंवरा वेळी तिची सखी पांडूचे वर्णन करते, ''पृथा, त्याची उंची, त्याचा बळकट बांधा अगदी तुला साजेसा आहे ! पुरुष कसा असावा ठाऊक आहे? भुकेल्या सिंहाप्रमाणे झेप घेणारा ! तुला साजेसा दुसरा कुणीच राजा माझ्या नजरेत दिसत नाही. मिठीत मात्र पहिल्या रात्री कुस्करली जाशील तू.''[१९] पण पहिल्या रात्रीचे कुंती वर्णन करते, ''पण सखी जे म्हणत होती, माझं मन ज्यासाठी आतुरलं होतं, तसं काही घडलच नाही, 'सतत प्रवास करून थकून गेलोय,' झोप येतेय म्हणत पलीकडे चेहरा वळवून झोपून गेला थोड्याच वेळात.''[२०]

भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांची सांगड घालणारी अतृप्त कुंती अनेक प्रश्नांची उत्तरे शोधू पहात आहे. लग्नानंतर सारं सुख अनुभवलं ते कल्पनेत असे कुंती सांगते. या विषयी दुर्दैवी ठरलेली कुंती म्हणते, ''लग्न झालं की सगळ्यांना लाभतं ते पतीचं सुख ! माझ्या वाट्याला आली ती पतीची हिंसा ! मुकाट्यानं झोपतही नव्हता बिचारा ! किती तरी विचित्र प्रकारांनी मला वागायला लावत होता. तरीही पराजित होत नव्हता. आणि अखेर माझ्यावर संतापून 'तु मला साजेशी बायको नाहीस' असा माझ्यावर ठपका ठेवून सारा दोष माझ्यावरच लादत होता. या सर्व प्रकाराने चेतावली गेलेली मी मात्र अतृप्ततेत शिजू, की दोषारोपामुळं खाक होऊ, अशा अवस्थेत तडफडत होते ! दिवस मावळला की अशीच हिंसा ! आणि त्यामुळे मनात खदखदणारा त्याच्या विषयीचा मूक तिरस्कार !''[२१] कुंती या सर्वातून आपल्या आयुष्याचे वास्तव व्यक्त करते.

कुंतीची प्रतिमा साकारताना भैरप्पांनी तत्कालीन समाज व्यवस्थेचा वेध घेतला आहे. कुंतीच्या जीवनात येणारा पहिला पुरुष हा दुर्वासऋषी आहे हे सत्य भैरप्पा

मांडतात. कुतूहलापोटी जन्माला आलेला मुलगा कर्ण हा दुर्वासऋषी पासूनच कुंतीला झालेला आहे. हे सत्य व्यक्त होते.

वंश वाढविण्यासाठी गेलेले पौरुष्यपरत मिळविण्याचा प्रयत्न पांडू करतो आहे. धृतराष्ट्राचा विवाह झाल्याचे समजताच पांडू नियोग पद्धतीच्या आधारे पुत्र प्राप्त करण्याचा मार्ग कुंतीला सांगतो आणि पांडू नियोगासाठी देवलोकातील ब्रह्मणप्रमुख 'यमधर्म' याला बोलावतो. तेव्हा पांडूने कुंतीकडून घेतलेले वचन हे विलक्षण बोलके ठरले आहे. "या पुरुषाशी मी मोहभरीत होणार नाही. तो माझ्याजवळ असताना माझं मनं पतीशीच लीन राहिल संतान - अपेक्षा शिवाय माझी दुसरी कुठलीच अपेक्षा राहणारं नाही. गर्भ राहिल्याचे खात्री होताच मी या पुरुषाला पितृसमान माणून त्याच्यापासून दूर जाईन..."[२२]

पांडू ही संधी कुंतीला दुसऱ्यांदा देतो तेव्हा देवलोकातील सैन्यप्रमुख 'मरूत' याला बोलावले जाते. आणि पांडू पुन्हा कुंतीला वचन घेण्यास भाग पाडतो, मरूतापासून झालेला मुलगा म्हणजे 'भीम'. यमधर्म आणि मरूत यांच्या सांगण्यावरून इंद्राला कुंतीचा मोह निर्माण होतो. तेव्हा तो स्वत: कुंतीकडे शरीर सुखाची अपेक्षा करतो. त्यावेळी कुंतीने घेतलेले वचन, "या पुरुषात मी गुंतून पडणार नाही..... गर्भ राहिल्याचे निश्चित झाल्यावर मी त्याला पितृसमान माणून..... "[२३] ही कुंतीच्या तोंडची वाक्य भैरप्पांनी अर्धवट सोडली आहेत कदाचित याची निरर्थकता कुंतीला वाटत असावी असे वाटते. कुंती माद्रीलाही नियोगाची संमती देते. तेव्हा माद्रीला अश्विनकुमारांपासून 'नकुल' आणि 'सहदेव' ही दोन मुले होतात.

मुलांना मिळालेला वनवास आणि अज्ञातवास कुंती विसरत नाही. सुनेची झालेली विटंबना ती विसरत नाही. अशी सहनशील कुंती कर्ण जन्माचे रहस्य मात्र मुलांपासून, समाजापासून लपवून ठेवते. युद्धाच्या वेळी कुंती म्हणते, "कुंतीच्या थोरल्या मुलाच्या भरवशावर उभारलेलं कुंतीच्या इतर पाच मुलांविरूद्धचं युद्ध."[२४]

एक संयमी धीरोदात्त अशी कुंती 'पर्व' मध्ये भैरप्पांनी साकारली आहे. कानीना पुत्राचा वियोग, पती सुखाची पदरी पडलेली निराशा, मुलांनी राजासूय यज्ञ करूनही

वाट्याला आलेला वनवास आणि अज्ञातवास या सगळ्याचा शेवट म्हणजे युद्ध. शेवटी वशंचा वारिस जगला नाही म्हणूनही कुंती दु:खीच राहिली आहे.

परंपरागत प्राप्त झालेले दैवीपण, मंत्रापासून झालेली मुले या कवचामध्ये आडकलेली कुंती भैरप्पांनी बाहेर काढली आहे. कुंती ही दु:खी, निराशा नशिबी आलेली सर्वसामान्य स्त्री सारखीच 'पर्व' मध्ये येते. मिथकांपासून वेगळी करून रेखाटलेली व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण ठरली आहे.

**द्रौपदी**

महाभारतामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेली ही व्यक्तिरेखा आहे. एक अजरामर व्यक्तिरेखा म्हणूनही द्रौपदीला ओळखले जाते. द्रौपदीच्या स्त्रीमनाचा शोध भैरप्पांनी घेतला आहे. द्रौपदी सर्वसामान्यांच्या लक्षात राहते, ते म्हणजे स्वयंवर, द्युत, वनवास, अज्ञातवास या प्रसंगामुळे. द्रौपदीच्या जीवनातील अनेक तळमळीचे प्रश्न 'पर्व' मध्ये साकारले आहेत. पाचजणांची पत्नी होणारी द्रौपदी स्वत्व हरवल्यासारखी 'पर्व' मध्ये साकार झाली आहे. चौथ्या भागामध्ये स्पष्ट होणारी द्रौपदी पुढे भीम, अर्जुन, कुंती यांच्या चिंतनातून स्पष्ट होते.

स्वयंवरामध्ये अर्जुनाला पाहताक्षणी मोहात पडलेली द्रौपदी वनवासामध्ये भीमाची होऊन राहते. सतत भीमाचा विचार करणारी द्रौपदी, सालकटंकटीला भेटण्यासाठी गेलेल्या भीमाच्या आठवणीने व्याकूळ होते. त्यावेळी ती म्हणते, ''रस्त्यात त्याला माझी आठवणं होईल का? की या कृष्णेचे नशीबच खोटं? कसलं सुख मिळालय मला ? आयुष्यभर कष्ट, दु:ख आणि क्लेश. इंद्रप्रस्थ उभं करून राजासूय यज्ञ करतानाही ह्या कृष्णेच्या मनाची जी उलाघाल होत होती, ती कुणाला ठाऊक आहे? राजमाता कुंतीलाही नाही. समजणारं हे ! फक्त त्याचाच आधार आहे, असं वाटलं होतं मला आता तोही तुटायची वेळ आली आहे का?''[२५]

पुरुषाच्या चातुर्यावर भावून सर्वस्व अर्पण करणारी द्रौपदी ही अर्जुनासाठी इतर चार जणांचा संग सहन करते. पाच जणांशी विवाह करणारी द्रौपदी सर्वांशी निष्ठेने

वागण्याचा प्रयत्न करते. त्या संदर्भात ती म्हणते, ''पाच पांडवांना जोडून पाच बोटात बांधून ठेवणं ही या कृष्णेची मात्र निष्ठा झाली ! ही निष्ठा राखण्याच्या बाबतीत मी आजवर जिंकले आहे.''[२६]

अनेक ठिकाणी द्रौपदी ही एक संयमी व्यक्तिरेखा म्हणून आपल्यासमोर येते. कुंती द्रौपदीच्या सौंदर्याचे वर्णन करते, ''बाळ, तू फक्त सुंदर नाहीस ! रंगाचा गोरेपणा फक्त बेताचा असला, तरी तुझे डोळे, नाक, ओठ, गाल याच आकर्षणकेवळ अलौकिक आहे''[२७] यावरून द्रौपदीच्या व्यक्तिमत्वाचा प्रत्यय येतो.

द्रौपदीच्या जीवनातील एक महत्त्वाचा प्रसंग म्हणजे द्युताचा रजस्वला असलेल्या द्रौपदीचे सभेमध्ये धिंदवडे काढले जातात. कर्ण, दु:शासन, दुर्योधन, शकुनि तिला वेश्या म्हणून संबोधतात. या प्रसंगी संयमाने वागणारी द्रौपदी सभेला धर्म म्हणजे काय हा प्रश्न विचारून सर्वांना अंर्तमुख करते. तेव्हा तिच्या चातुर्याची कल्पना येते. द्युत प्रसंगी द्रौपदी जणू भाकित वर्तवते आहे असे वाटते. ती म्हणते, ''तो द्वारकेच्या सेनेसह चाल करून येईल आणि दक्षिणेकडून पांचाल सैन्य! मग राहिल ती या हस्तिनावतीची राख ! ती ही गंगेच्या पाण्यात मिसळून गेलेली.''[२८]

द्युत प्रसंगामध्ये आपल्या बुद्धीच्या जोरावर पती आणि मुलांना दास्यातून मुक्त करते रूढ कथमध्ये आलेला वस्त्रहरणाचा प्रसंग आणि कृष्णाने अदृश्यपणे वस्त्रांचा केलेला पुरवठा ही घटना मात्र 'पर्व' मध्ये आलेली नाही. त्यावेळी कृष्ण द्वारकेवर झालेली चढाई थोपवत होता हे सत्य त्यांनी मांडले आहे. अज्ञातवासामध्ये द्रौपदी एका वेगळ्याच भूमिकेतून पुढे येते. विराट राजाच्या राणीची दासी म्हणून सौरध्रीच्या रूपात राहते.

युद्धाची निश्चिती झाल्यानंतर सर्वाची शक्ती बनून राहते. पण स्वत: मात्र दु:खीच असलेली दिसून येते. युद्धामध्ये विजय प्राप्त झाल्यानंतर बेसावध असतानाच पाची मुलांचा घेतलेला बळी हे सर्वात मोठे दु:ख द्रौपदीला सहन करावे लागते. मुलांच्या मृत्यूनंतर आक्रोश करणारी द्रौपदी कृष्णाला म्हणते, ''अभिमन्यू गेला, तेव्हा अर्जुनानं आपल्या बायकोला, सुभद्रेला मिठी मारून आपल्या अश्रूंनी चिंब केलं होतं... तसा

कुणीही केला नाही! सगळे लांब बसले, पहा! प्रेक्षकांसारखे''[२९] यातून द्रौपदीच्या मनाची तळमळ व्यक्त होते.

सतत दुःखाचे आघात झेलणारी व्यक्तिरेखा आणि प्रत्येक प्रसंगी परिस्थितीवर मात करण्याचे सामर्थ्य असलेली व्यक्तिरेखा म्हणजे द्रौपदी द्युत सभेला निरूत्तर करणाऱ्या स्त्रीची प्रतिमा भैरप्पांनी साकारली आहे. द्रौपदीच्या स्त्रीमनाचा वेध घेण्याचा प्रयत्न भैरप्पांनी केलेला आहे. परंपरागत रूढ असणारी आणि 'पर्व' मध्ये साकारलेली द्रौपदीची प्रतिमा यामधील विरोधाभास स्पष्ट होतो आहे. द्रौपदीच्या जीवनावर चढलेली मिथके त्यांचे भैरप्पांनी उच्चाटन केले आहे. सर्वसामान्य स्त्रीच्या दुःखा इतकेच प्रगाद दुःख असलेली ही व्यक्तिरेखा भैरप्पा 'पर्व' मध्ये साकारतात.

### 'पर्व' मधील गौण व्यक्तिरेखा

### धर्म

'धर्म' ही व्यक्तिरेखा 'पर्व' मध्ये अत्यंत कमी प्रमाणात येते. पण तिचे इतर व्यक्तिरेखांच्या जीवनामध्ये असलेले स्थान मात्र महत्त्वाचे आहे. भैरप्पांनी या व्यक्तिरेखेला स्वतंत्र स्थान दिलेले नाही. ती इतर व्यक्तिरेखांच्या जीवनातून, चिंतनातून साकार होत जाते. धर्म हा कुंतीचा नियोगाने 'यमधर्म' पासून झालेला मुलगा आहे. जन्माला आल्यानंतर त्याचे वर्णन कुंती करते, ''हिमाप्रमाणे शांत चेहरा, गोरापान रंग, ज्यासाठी सगळेजण असूसलेले होते, तो मुलगा ! भूमीला स्पर्श होताच रडला.''[३०]

धर्म हा संपूर्ण आर्यवर्तामध्ये धर्मज्ञ म्हणून ओळखला जात होता. उत्तम राज्यकर्ता, विवेकी, सहनशील, शांत स्वभावाचा धर्म आपल्या भावांच्या सहाय्याने राजासूय यज्ञ करतो. स्वताःचे वेगळे असे राज्य उभारतो. अशा या धर्माचे सर्व भावंडावर प्रेम असले तरी सर्वात जास्त प्रेम हे अर्जुनावर आहे. धर्माचा द्युतामधील दुबळेपणा जाणून घेऊन दुर्योधन त्याला द्युत खेळायला बोलवतो. शकुनिच्या कपटाने धर्म द्युतामध्ये सर्वार्थाने हरत जातो. त्यातूनच पांडवांच्या वाट्याला येतो तो बारा वर्षाचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास.

थोरांविषयी असलेली आदराची भावना, अनेक ठिकाणी दिसणारा धर्माचा उदात्तपणा यामुळे धर्म लोकप्रिय होत जातो. युद्धामध्ये अनेक वेळा समेट मिळविण्यासाठी प्रयत्नही करताना धर्म दिसून येतो. अखेर युद्धामध्ये विजय प्राप्त करूनही धर्म पराजीत होतो आहे. राज्य चालविण्यासाठी राज्यात काहीच शिल्लक नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी कर देण्यास नकार दिलेला आहे. धर्मराजापुढे युद्धानंतर असंख्य प्रश्न उभे राहिले आहेत. असंख्य स्त्रिया गर्भवती राहिल्या आहेत. त्याचा पिता कोण या संभ्रमावस्थेत सापडलेला 'धर्म' भैरप्पानी 'पर्व' मध्ये अत्यंत समर्पकतेने रेखाटला आहे.

मानवी वलय प्राप्त झालेल्या 'पर्व' मधील व्यक्तिरेखांपैकी ही एक व्यक्तिरेखा भैरप्पांनी अत्यंत सूक्ष्मपणे टिपली आहे.

**शल्य**

'पर्व' कादंबरीमध्ये या व्यक्तिरेखा महत्त्व दिले गेले आहे. 'पर्व' ची सुरुवात शल्य राज्याच्या चिंतनातून झाली आहे. मद्र देशाचा राजा शल्य हा नकुल, सहदेव यांचा मामा आहे. युद्धामध्ये मात्र नकुल, सहदेव यांचा प्रतिस्पर्धी म्हणून भूमिका घेणारा शल्य आहे. माद्र देशाचा राजा आणि क्षत्रिय म्हणून अभिमान बाळगणाऱ्या शल्याला द्रौणाच्या वधानंतर कर्णाचे सारथ्य करावे लागते. युद्धाच्या वेळी कर्णाला प्रोत्साहित करण्याऐवजी त्याला दोष देत बसतो आणि त्याच्या रथाचे सारथ्य सोडून देतो. कर्णाच्या मृत्यूला आपण जबाबदार असल्याची खंत शल्याला वाटत राहते. शेवटी कौरव सैन्याचे सेनापती होण्याचा मान शल्य राजाला मिळतो. आणि याचा अभिमानही त्याला वाटत राहतो. असा हा मद्र देशाचा राजा अनेक प्रसंगी अविवकाने वागलेला दिसनू येतो. 'पर्व' कादंबरीमध्ये महत्त्वप्राप्त झालेली ही व्यक्तिरेखा भैरप्पांनी अत्यंत सूक्ष्मपणे साकार केली आहे.

## दुर्योधन

दुर्योधन ही व्यक्ती 'पर्व' मध्ये सर्वत्र ठाण मांडून बसल्यासारखी वाटते. प्रत्येक ठिकाणी पांडवांना हरवण्याची, त्यांचा नाश करण्याची इच्छा मनात बाळगणारा दुर्योधन भैरप्पांनी मुळ महाभारतामध्ये जसा आला आहे तसाच मांडला आहे.

अतिशय क्रोधी लालची, स्वार्थी, अविवेकी अशा अवगुणांनी बरबरटलेली दुर्योधनाची व्यक्तिरेखा 'पर्व' मध्ये भैरप्पा रेखाटतात. पण हिच व्यक्तिरेखा कर्णाबरोबर अतिशय प्रेमाने वागते. कर्ण सूत असूनही त्याला आपल्या बरोबरीचे स्थान दुर्योधनाने दिलेले आहे. दुर्योधन प्रत्येक प्रसंगी कर्णाचा सल्ला महत्त्वाचा मानताना दिसून येतो. असा हा दुर्योधन हस्तिनावतीचे राज्य आपल्याला मिळावे म्हणून युद्ध उभं करतो.

दुर्योधन पांडवांबरोबर कुटीलतेने वर्तन करतो आहे. भर सभेत द्रौपदीला असभ्य बोलतो, तिची विटंबना करतो, तिला दासी, वेश्या संबोधतो. कुंतीला झालेली मुलं आर्य नाहीत ते पांडूचे पुत्र नाहीत असे वेळोवेळी उल्लेखताना दुर्योधन दिसून येतो. पांडूची मुलं म्हणण्याऐवजी तो सतत कुंतीची मुलं म्हणून संबोधतो.

युद्धासाठी सहाय्य मिळावे म्हणून दुर्योधन सर्वत्र नियोग हा अधर्म आहे असे सांगतो. पण आपले पिता धृतराष्ट्र हे देखील नियोगातूनच जन्माला आले आहेत हे मात्र विसरतो. असा हा दुर्योधन कुटील बुद्धीचा म्हणूनही 'पर्व' मध्ये आलेला आहे, भैरप्पांनी त्याच्या चांगल्या राजनीतिचाही अनेक ठिकाणी उल्लेख केलेला आहे.

एक अहंकारी व्यक्तिमत्व भैरप्पांनी अगदी तपशीलाने रेखाटले आहे. दुर्योधना जवळ असलेली कौशल्यही 'पर्व' मध्ये टिपली आहेत. द्वेश, मत्सर, अहंकारी, असा सर्वसामान्य पुरुषा सारखाच दुर्योधन 'पर्व' मध्ये भैरप्पांनी साकारलेला आहे.

## स्त्री व्यक्तिरेखा

### सालकटंकटी

'पर्व' मध्ये येणारी ही व्यक्तिरेखा गौण असली तरी महत्त्वाची आहे. सालकटंकटी ही भीमाची पहिली पत्नी. ती वाचकांसमोर येताना भीमाच्या आत्मचिंतनातून येते.

हिडिंब वनामध्ये वास्तव्य करणाऱ्या हिंडब राक्षसाची बहिण, तिला हिडिंबा असेही संबोधले जाते. भीम तिचे वर्णन करताना म्हणतो, "ही काही माया आहे, की काय, असं वाटण्याएवढी तिची ती प्रचंड उंची माझ्या खांद्यापर्यंत येणाऱ्या आर्य पुरूषांपेक्षा अधिक उंची, भरगच्च गाईसारखा बांधा. फक्त कमरेला गुंडाळलेला कातड्याचा तुकडा .... स्पष्टपणे आठवतंय हे कसले मायावी रूप, असंही वाटून क्षणभर भीतीही वाटून गेली."[३१] भीमाने प्रथम जेव्हा सालकटंकीला पाहिले तेव्हाचा प्रसंग भीम आठवून तेव्हा झालेली मनाची अवस्था व्यक्त करतो आहे. पाहता क्षणी भीमावर मोहून जाणारी आणि तुझ्या विषयी माझ्या मनात अपेक्षा निर्माण झाली आहे. तू माझा नवरा हो. असे म्हणण्याइतपत ती धीट होती.

दुर्योधनापासून लपून राहण्यासाठी हिडिंब वन हे चांगले ठिकाण असल्याने कुंती भीमाचे लग्न सालकटंकटीशी लावून देते. अगोदरच मोहून गेलेली सालकटंकटी भीमाला आणि इतर भांवडांना आणि त्यांच्या आईला सुखी ठेवण्याचा प्रयत्न करते.

एक वर्ष राहून भीम निघून जातो. पण आयुष्यभर त्याची वाट सालकटंकटी पाहत राहते. अशी व्यक्तिरेखा भैरप्पांनी 'पर्व' मध्ये रेखाटताना स्त्रीच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### उलुपी, चित्रंगदा आणि सुभद्रा

या तीन व्यक्तिरेखा अर्जुनाच्या जीवनाशी संबंधित आहेत. उलुपी ही हत्ती माणसाळणाऱ्या नाग प्रमुखाची मुलगी. अर्जुनाच्या सौंदर्यावर मोहून गेलेली. द्रौपदी नंतर अर्जुनाने या नागकन्येशी विवाह केलेला आहे. मुक्त विचारांची उलुपी भैरप्पांनी

साकारली आहे.

चित्रवहन राजाची मुलगी चित्रागंदा. चित्रवहन राजाचा वंश वाढविण्यासाठी अर्जुन तिच्याशी विवाह करतो आहे. अर्जुनही तिच्यावर पाहता क्षणी मोहून गेलेला आहे. तिचे वर्णन करताना अर्जुन म्हणतो, ''स्पष्ट पण नाजूक रेषा ओढावी, तसे पारदर्शक डोळे, सडपातळ भुवया, पिवळसर गोऱ्या रंगाचा, लालसर छटेचा, मऊ कांत आकर्षक चेहरा.''[३१]

सुभद्रा ही अर्जुनाच्या जीवनातील व्यक्तिरेखा स्पष्टपणे आपल्या समोर येते. उलुपी, चित्रागंदा आणि कितीतरी स्त्रियांशी संग करून नंतर अर्जुनाने सुभद्राशी विवाह केलेला आहे. सुभद्रा ही कृष्णाची बहिण. अर्जुन म्हणतो, सुभद्राचे काळेभोर केस, तिच्या चेहऱ्यावरचा भोळा, मुग्ध भाव पाहताच मनामध्ये भरली. कृष्णाच्या मदतीने अर्जुन सुभद्राला पळवून नेऊन सुभद्रेशी विवाह करतो. सुभद्राच्या चातुर्याची कल्पना येते ती विवाहाच्या वेळीच. सुभद्रा अर्जुनाला अनेक अटी घालून त्याच्याशी विवाह करते.

अशा या व्यक्तिरेखा अर्जुनाच्या जीवनातील त्यांचे स्थान निश्चित करत भैरप्पांनी साकार केल्या आहेत.

## गांधारी

महाभारतातील गांधारी ही व्यक्तिरेखा अतिशय लोकप्रिय झाली आहे. तशाच पद्धतीने ती 'पर्व' मध्येही साकार होत जाते. तिने केलेल्या त्यागामुळे सर्वांच्या मनावर ती अनंतकाळ परिणाम करत राहते. एक आदर्श माता, पती अंध असलेला समजताच डोळ्यावर पट्टी बांधून घेतल्याने महान पतीव्रता, महासाध्वी अशी बिरूदे गांधारीला मिळाली आहेत.

कुरूवंश वाढविण्यासाठी धृतराष्ट्राचा विवाह भीष्म गांधार देशाची राजकन्या गांधारी हिच्याशी करतो. लग्ना अगोदरच तिने अंधत्व स्वीकारले आहे. अशी ही व्यक्तिरेखा सर्वस्वी वेगळी ठरली आहे. संपूर्ण कादंबरीमध्ये धुसर व्यक्तिमत्व असलेल्या

गांधारीची प्रतिमा तेराव्या भागात आपल्यासमोर स्पष्ट स्वरूपात येते.

मुलं, नातवंड यांचा युद्धामध्ये होणारा नाश आणि वाट्याला आलेले आयुष्यभराचे अंधत्व हे दु:ख ती मुकपणे स्वीकारते. शेवटी कृष्ण तिच्या डोळ्यावरची पट्टी काढून वास्तव जीवनाचे सत्य स्वीकारण्याचा प्रयत्न करून देतो. त्यावेळी गांधारी विचार करते, मी पट्टी काढून सर्वांना बघावं किंवा सर्व हस्तिनावती पहावी असे कोणालाच का वाटले नाही. आणि आता सर्वनाश झाल्यावर पट्टी काढल्याचे दु:खही तिला होते.

अशी ही त्यागी व्यक्तिरेखा भैरप्पांनी मिथकातून मुक्त करून रेखाटली आहे. शंभर मुलांना जन्म देणारी गांधारी ही प्रतिमा जनमानसात आहे. पण प्रत्यक्षात मात्र तिला चौदा मुले आणि इतर सर्व तिच्या दासीची होती. हे वास्तव भैरप्पा मांडतात.

**हिरण्यवती आणि उत्तरा**

या दोन व्यक्तिरेखा 'पर्व' मध्ये अगदी अल्प काळासाठी येतात. पण कादंबरीला वेगळे वळण देण्यासाठी त्या महत्त्वाच्या ठरल्या आहेत. हिरण्यवती ही शल्य राजाची नात पहिल्याच भागामध्ये आपल्यासमोर येते. लग्नाचे वय असुनही लग्न न झालेल्या मुलीच्या मनाचा वेध घेतला आहे. शेवटी ती अनार्य मुलाबरोबर जंगलात पळून जाऊन विवाह करते. शेवटच्या भागामध्ये मातृत्व प्राप्त झालेली हिरण्यवती वनाला लागलेली आग यापासून जीव वाचविण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येते. फ्लॅशबॅक पद्धतीने प्रकटणारी व्यक्तिरेखा भैरप्पांनी साकारली आहे.

उत्तरा ही विराट राजाची मुलगी. अभिमन्यूच्या पत्नीच्या रूपात आपल्या समोर येते. अल्पवयात वैधव्य प्राप्त झालेली उत्तरा वाचकांच्या मनावर विशेष परिणाम करते. जन्माला येणारे मुलही मरण पावले आहे. अशी ही व्यक्तिरेखा भैरप्पांनी 'पर्व' मध्ये रेखाटली आहे.

या दोन व्यक्तिरेखा वाचकांना विचार करायला लावणाऱ्या आहेत. भैरप्पांनी स्त्रीमनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे हे स्पष्ट होते.

## समारोप

अशा प्रकारे 'पर्व' कादंबरीमध्ये येणाऱ्या व्यक्तिरेखा या दैवी कवच भेदून मानवी रूपात वाचकांच्या समोर येतात. पौराणिक पण वास्तव वादाला जवळ करणारी कादंबरी व्यक्तिरेखेमुळे वेगळी ठरली आहे. या व्यक्तींचे आचारधर्म, आवडीनिवडी, स्वभावधर्म, घटनाप्रसंग समस्या हे सारे ज्वलंत आणि प्रत्ययकारी रूप घेऊन कादंबरीत येताना दिसतात.

प्रस्तुत व्यक्तिरेखांशीवाय विदूर, धृतराष्ट्र, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कृपाचार्य, युयुधान, युयुत्सु, कृष्णद्वैपायन यासारख्या व्यक्तिरेखा ही महत्त्वपूर्ण मानल्या जातात. कादंबरीला वेगळा आकार देण्यासाठीच जणू या आलेल्या आहेत असेच वाटत राहते. या व्यक्तिरेखांनी मानवी पातळी स्वीकारली आहे. त्याच्या जीवनाचा अन्वय लावताना भैरप्पांनी महाभारतातील शाप, वर, चमत्कार, योगायोग, पुनर्जन्म इ. अमानवीय व्यक्तीचा मानवी पातळीवर विचार केला आहे. देवत्वाचा, विभुतीत्वाचा मुलामा बाजूला सारला आहे. या व्यक्तिरेखांनी दैवी रूप नाकारून ऐतिहासिक भौतिक, बुद्धीसंम्मत, तर्कसंगत रूप स्वीकारले आहे. असेच भैरप्पांनी रेखाटले आहे.

भैरप्पांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा अनेक वैशिष्ट्यांनी तळपणाऱ्या आहेत. वाचकांच्या मनावर त्या विशेष प्रभाव टाकतानाही दिसून येतात. आपल्या बहुरंगी व्यक्तिमत्वामुळे इतरांना प्रभावित करणारा कृष्ण, अर्जुना इतकी विलोभणिय व्यक्तिमत्व म्हणजे कर्ण, अखेर पर्यंत मनाचा पिळ घेणारा दुर्योधन, आडदांड भीम, शांत नकुल - सहदेव, आयुष्यभर पुत्र विरह सोसणारी कुंती, आपल्या मनाचा ठाव लागू न देणारी द्रौपदी पाच पतींची शक्ती बनूनही स्वत:मात्र दु:खी अशा या व्यक्तिरेखा 'पर्व' मध्ये आपले वेगळेपण सिद्ध करताना दिसून येतात.

भैरप्पांनी कल्पिताला, दैवीपणाला, शाप- उ:शापाला बाजूला सारून रूढ मिथकांचा अन्वय स्पष्ट करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न केला आहे. देव मानलेल्या व्यक्ती देव नसून माणसचं होती हे भैरप्पांनी 'पर्व' मध्ये स्पष्ट केले आहे. पुढील प्रकरणामध्ये आपण 'पर्व' मधील मिथकांचे वेगळेपण याचा आढावा घेणार आहोत.

**संदर्भ सुची :**


१. भैरप्पा, एस. एल. : 'पर्व' (भावानुवाद : कुलकर्णी उमा), मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पाचवी २००६, पुनर्मुद्रण २००७ पृ. ५७१

२. तत्रैव : पृ. ६२२

३. तत्रैव : पृ. ८३

४. तत्रैव : पृ. १०८

५. तत्रैव : पृ. ६९०

६. तत्रैव : पृ. ७१२

७. तत्रैव : पृ. ७१२

८. तत्रैव : पृ. ८३

९. तत्रैव : पृ. १७३

१०. तत्रैव : पृ. २३९

११. तत्रैव : पृ. ५८९

१२. तत्रैव : पृ. ६१

१३. तत्रैव : पृ. ३८७

१४. तत्रैव : पृ. ४२०

१५. तत्रैव : पृ. ४२१

१६. तत्रैव : पृ. १४५

१७. तत्रैव : पृ. २६३

१८. तत्रैव : प्रस्तावना पृ. १२

१९. तत्रैव : पृ. ४०

२०. तत्रैव : पृ. ४१

२१. तत्रैव : पृ. ४२

२२. तत्रैव : पृ. ६९

२३. तत्रैव : पृ. ८८

२४. तत्रैव : पृ. ७१४

२५. तत्रैव : पृ. १७१

२६. तत्रैव : पृ. १७६

२७. तत्रैव : पृ. १८१

२८. तत्रैव : पृ. २१२

२९. तत्रैव : पृ. ७५३

३०. तत्रैव : पृ. ७२

३१. तत्रैव : पृ. ११८

३२. तत्रैव : पृ. २५६